मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | » पुणे, पिंपरी-चिंचवड | » गुरुवार, दि. 17 ऑक्टोबर 2024 | पान- 1


# आचारसंहितेची ऐशी-तैशी

## विधानसभा निवडणुकीची घोषणा निवडणूक आयोगाने केली : शहरात आचारसंहितेचे पालन होते की नाही अशी स्थिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीची घोषणा निवडणूक आयोगाने मंगळवारी केली. त्यामुळे आचारसंहितेचे पालन करत महापालिका प्रशासनाने राजकीय नेत्यांचे फलक काढायला आणि कायमस्वरूपी फलक झाकायला सुरुवात केली. मात्र, विद्यमान आमदारांसह इच्छुकांनी त्यांची कार्यालये, सार्वजनिक ठिकाणे, ऑटोरिक्षा, पीएमपी बस (पुणे महानगर परिवहन महामंडळ), समर्थकांच्या वाहनांवर केलेली जाहिरात बाजीचे फलक, पोस्टर्स, भित्तिपत्रके बुधवारी सायंकाळपर्यंतही दिसत होती. त्यामुळे आचारसंहितेचे पालन होते की नाही, कि केवळ घोषणाच ठरते, अशी स्थिती शहरात आहे.

राज्य विधानसभेची निवडणूक जाहीर झाली आहे. त्यानुसार, उद्योगनगरीतील पिंपरी, चिंचवड, भोसरीसह लगतच्या भोर-वेल्हे, मावळ, खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघात निवडणूक होणार आहे. पिंपरी व चिंचवडमध्ये इच्छुकांची संख्या भोसरी, मावळच्या तुलनेने सर्वाधिक आहे. त्यामुळे गणेशोत्सव, गोकूळ अष्टमी, नवरात्रोत्सव, दसरा, कोजागरी पौर्णिमा आदी सणांच्या पार्श्वभूमीवर मोठेमोठे होर्डिंग लावून 'चमकोगिरी' केली होती. विविध कार्यक्रमांच्या आयोजनासह मोठमोठ्या बक्षिसांची घोषणा केली होती. त्या फलकांवर स्वतःसह राजकीय पक्षाचे नाव व चिन्ह, राजकीय नेत्यांची छायाचित्रे छापली होती. विद्यमानांनी केलेल्या कामांची जाहिरातबाजी होर्डींगच्या माध्यमातून केली आहे. त्याला प्रतिउत्तर देण्यासाठी इच्छुकांनीही होर्डींगद्वारे जाहिरातबाजी केली आहे. शिवाय, 'आपला नेता', 'दादा', 'भाऊ', 'अण्णा', 'आप्पा', 'तात्या', 'लोकनेते', 'युवानेते', 'भावी आमदार' अशा स्वरूपाच्या उपाध्या लावून रिक्षांवर अनेकांनी जाहिरातबाजी केली आहे. अनेकांनी स्वतःसह समर्थकांच्या खासगी वाहनांवरही पोस्टरबाजी केली आहे. आचारसंहिता लागू झाल्यानंतरही हे होर्डिंग बुधवारी काही ठिकाणी बघायला मिळाले. रिक्षांसह वाहनांवर पोस्टर्स बघायला मिळाले, त्यामुळे आचारसंहितेचे काय? असा प्रश्नउपस्थित होत आहे.




### फलक, जाहिराती हटविण्याचा आदेश

» महाराष्ट्र राज्य सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ ची घोषणा भारत निवडणूक आयोगाने केली आहे. त्यामुळे आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या आचारसंहितेची सर्व प्रशासकीय यंत्रणांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. आचारसंहितेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे. आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची प्रत्येकाने दक्षता घ्यावी. महापालिकेच्या कार्यक्षेत्रात नियमबाह्य तसेच अनधिकृतपणे लावलेले राजकीय फ्लेक्स, बॅनर, होर्डिंग, चिन्ह, ध्वज, फलक, भिंतीवरील राजकीय जाहिराती आदी तत्सम बाबी तत्काळ हटविण्यात याव्यात, असा आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी दिला आहे.

### वाहनांवरील जाहिराती कोण हटविणार?

» सार्वजनिक ठिकाणचे होर्डिंग, जाहिरात फलक, महापालिकेने लावलेले लोकप्रतिनिधींच्या नावांचे फलक महापालिकेकडून हटविण्यात येत आहेत. ही कार्यवाही मंगळवारपासूनच क्षेत्रीय स्तरावर सुरू केली आहे. मात्र, रिक्षा व खासगी वाहनांवर लावलेल्या जाहिराती, पोस्टर्स, पक्षाचे चिन्ह, नावे, पदांचा उल्लेख असलेले पोस्टर्स कोण हटविणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. निवडणुकीची अधिसूचना मंगळवारी (ता. २२) जाहीर होणार आहे. शिवाय, काही इच्छुकांनी प्रचारही सुरू केलेला आहे. त्यामुळे जाहिरातींमुळे आचारसंहितेचा भंग करणाऱ्यावर काय कारवाई होणार? असा प्रश्न आहे.

---

# भोसरी विधानसभेत बदल घडविण्यासाठी यंत्रणा सज्ज : अजित गव्हाणे

## इंद्रायणीनगर येथील पर्ल बँक्वेट हॉल येथे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने बैठक पार पडली

**पिंपरी | प्रतिनिधी**

निवडणुकीमध्ये केंद्र व बुथ प्रमुखांची जबाबदारी महत्वपूर्ण असून बुथ यंत्रणा सक्षम असेल तरच निवडणूक जिंकणे सोपे होते, त्यामुळे कार्यकर्त्यांनी बूथ यंत्रणेची जबाबदारी आत्मविश्वासाने पार पाडावी असे आवाहन स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केले. आपली बूथ यंत्रणा सक्षम आहे. आता केंद्रप्रमुख या संरचनेप्रमाणे आपल्याला निवडणुकीला सामोरे जायचे आहे. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर जो उमेदवार अधिकृतरित्या निवडणुकीला सामोरा जाणार आहे. त्यामागे ही यंत्रणा उभी करून भोसरी विधानसभेत आपल्याला बदल घडवायचा आहे. महाविकास आघाडीमध्ये एकजूट असून या एकजुटीतून भोसरी विधानसभेत महाविकास आघाडीचाच आमदार होणार असल्याचेही अजित गव्हाणे म्हणाले.

इंद्रायणीनगर येथील पर्ल बँक्वेट हॉल येथे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने बूथ व केंद्रप्रमुख, पदाधिकारी, माजी नगरसेवक यांची बैठक (दि. 15) पार पडली. त्यावेळी अजित गव्हाणे बोलत होते. यावेळी महाविकास आघाडीचे आजी-माजी पदाधिकारी, पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अजित गव्हाणे यावेळी म्हणाले, प्रत्येक बुथ कार्यकर्त्यांनी गांभीर्याने घेऊन निवडणुकीची जबाबदारी पार पाडायची आहे. निवडणुकीची लढाई ही नेहमी कार्यकर्त्यांच्या जीवावर लढली जाते. कार्यकर्ते हाच निवडणुकीचा खरा कणा असतो. आपली बुथ यंत्रणा सक्षम आहे मात्र आता केंद्रप्रमुख या संरचनेप्रमाणे आपल्याला निवडणुकीला सामोरे जायचे आहे. राज्यात निवडणुकांचे बिगुल वाजले असून राज्यात निवडणुका देखील जाहीर झाल्या आहेत. त्यामुळे एकजुटीने कामाला लागायचे आहे.

### परिवर्तनाच्या लढाईतून बदल घडवायचा..

»भोसरी मतदारसंघांमध्ये परिवर्तनाची लढाई आपण सुरू केली असल्याचे सांगून अजित गव्हाणे म्हणाले, भोसरी मतदारसंघातील भ्रष्टाचार, दडपशाही यामुळे येथील प्रत्येक नागरिक कंटाळलेला आहे. येथील प्रत्येक कामातील भ्रष्टाचार अनेक गैरसोयींसाठी कारणीभूत ठरत आहे. मतदार संघातील चहुबाजूच्या वाहतूक कोंडीने अक्षरशः येथील नागरिक मेटाकुटीला आला आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आपल्याला परिवर्तन घडवायचे आहे.

# तीन कंत्राटी कनिष्ठ अभियंते निर्दोष; पुन्हा कामावर रुजू

## भ्रष्टाचाराचा आरोप असलेल्या 16 पैकी तीन कंत्राटी कनिष्ठ अभियंत्यांना पीएमआरडीएने अभय दिल्याचे चित्र आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

भ्रष्टाचाराचा आरोप असलेल्या १६ पैकी तीन कंत्राटी कनिष्ठ अभियंत्यांना पीएमआरडीएने अभय दिल्याचे चित्र आहे. त्यांचा चौकशी अहवाल समोर आला आहे. त्यामध्ये, त्यांचा भ्रष्टाचारामध्ये कोणताही सहभाग नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. दक्षता अधिकाऱ्यांनी त्याबाबतचा अहवाल पीएमआरडीए प्रशासनाकडे सुपूर्द केला. त्यानुसार, तीन कंत्राटी कनिष्ठ अभियंत्यांना पुन्हा कामावर रुजू केले असल्याचे प्रशासनाने सांगितले. गेल्या अनेक दिवसांपासून चौकशी सुरू असून केवळ तिघांचा अहवाल प्राप्त झाला. तेही निर्दोष सुटले असल्याने ही चौकशी संशयास्पद असल्याची भावना सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक व्यक्त करत आहेत.

( उर्वरित पान २ वर )



### भ्रष्टाचाराला खतपाणी घालण्याचा प्रकार

» नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन संबंधित कनिष्ठ अभियंत्यांची चौकशी करण्याचे आदेश पीएमआरडीए प्रशासनाने दिले होते. दक्षता अधिकाऱ्यांमार्फत ही चौकशी सुरू करण्यात आली. तत्पूर्वी, या १६ कंत्राटी कर्मचाऱ्यांवर तात्पुरती निलंबनाची कारवाई झाली होती. गेल्या अनेक दिवसांपासून ही चौकशी सुरू असून ती अद्याप पूर्ण झालेली नाही. केवळ तीन कंत्राटी कनिष्ठ अभियंत्यांबाबतचा चौकशी अहवाल प्रशासनाकडे प्राप्त झाला. त्यामध्ये संबंधित अभियंत्यांचा भ्रष्टाचारात सहभाग नसल्याचे नमूद असल्याचे प्रशासनाने सांगितले. त्यामुळे, त्यांना पुन्हा कामावर रुजू करुन घेण्यात आले आहे. या प्रकरणावरून सामाजिक कार्यकर्ते तीव्र संताप व्यक्त करत आहेत. भ्रष्टाचाराला खतपाणी घालण्याचा प्रकार असल्याचे नागरिक म्हणत आहेत.

> “ संबंधित कर्मचाऱ्यांच्याविषयी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. 'पीएमआरडीए'च्यावतीने त्यांची दक्षता अधिकाऱ्यांमार्फत चौकशी सुरू होती. तीन जणांचा अहवाल प्राप्त झाला आहे. जे आरोप झालेत. त्यामध्ये तीन जणांचा समावेश नसल्याचे अहवालात नमूद आहे. पुढील कार्यवाही करू.
>
> - सुनील पांढरे, सहआयुक्त, प्रशासन विभाग, पीएमआरडीए.

# आरटीई न पाळणाऱ्या मदरशांना दणका

## निधी थांबविण्याची शिफारस, राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाने सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पाठवले पत्र

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाने (नॅशनल कमिशन फॉर चाइल्ड प्रोटेक्शन - एनसीपीसीआर) सर्व राज्यांना पत्र लिहून राईट टू एज्युकेशन (आरटीई) नियमांचे पालन न करणाऱ्या मदरशांना दिला जाणारा निधी थांबवावा, अशी शिफारस केली आहे.

'गार्डियन्स ऑफ फेथ ऑर अपोनंट्स ऑफ राइट्स : कॉन्स्टिट्यूशनल राईट्स ऑफ चिल्ड्रन अगेन्स्ट मदरसा' हा अहवाल तयार केल्यानंतर आयोगाने सदर सूचना केली आहे. एनसीपीसीआर म्हणाले, “मदरशांमध्ये संपूर्ण लक्ष धार्मिक शिक्षणावर असते. त्यामुळे मुलांना आवश्यक ते शिक्षण मिळत नाही. परिणामी ते इतर मुलांपेक्षा मागे राहतात.”

राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष प्रियांक कानूनगो यांनी मदरशांना राज्य सरकारांकडून मिळणारा निधी थांबवण्याची शिफारस केली आहे. या संदर्भात त्यांनी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्रही लिहिले आहे. आपल्या पत्रात त्यांनी आयोगाच्या अहवालाचाही हवाला दिला आहे.

प्रियांक कानुनगो यांचे हे पत्र केंद्रशासित प्रदेशांसह सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना आणि प्रशासकांना उद्देशून आहे. पत्राच्या सुरुवातीलाच त्यांनी 'प्रोटेक्टर्स ऑफ ट्रस्ट ऑर प्रॉपरर्स ऑफ राइट्स : कॉन्स्टिट्यूशनल राइट्स ऑफ चिल्ड्रन अगेन्स्ट मदरसा' या अहवालाचा हवाला दिला आहे. लहान मुलांचे मूलभूत हक्क आणि अल्पसंख्याक समाजाचे हक्क यांच्यात विरोधाभास दिसत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. मदरशांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळत नाही, हे त्याचे कारण असल्याचा दावा यात करण्यात आला आहे.

पत्रात प्रियांक कानूनगो यांनी राज्य सरकारांकडून मदरशांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीवर बंदी घालण्याची शिफारस केली आहे. यासोबतच राज्यात सुरू असलेले मदरसा बोर्डही बंद करावे. या शिफारशींसोबतच मदरशांमध्ये शिकणाऱ्या सर्व गैरमुस्लीम विद्यार्थ्यांची ओळख करून त्यांना सरकारी शाळांमध्ये प्रवेश देण्यासही सांगण्यात आले आहे. असा रोडमॅप बनवला गेला पाहिजे की ज्यामुळे देशातील सर्व मुलांच्या भविष्यासाठी अनुकूल वातावरण तयार होईल. आपल्या शिफारशी देशाला चांगले बनवण्यासाठी प्रभावी ठरतील, अशी आशा कानूनगो यांनी व्यक्त केली आहे. त्यांनी सर्व अधिकाऱ्यांना पत्रात लक्ष घालून आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.



### यूपी मदरसा कायद्यावरून वाद, सुप्रीम कोर्टाने घातली बंदी

» सर्वोच्च न्यायालयाने ५ एप्रिल २०२४ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या 'यूपी बोर्ड ऑफ मदरसा एज्युकेशन अ‍ॅक्ट २००४' असंवैधानिक घोषित करण्याच्या निर्णयाला स्थगिती दिली होती. यासोबतच केंद्र आणि उत्तर प्रदेश सरकारकडूनही उत्तरे मागवण्यात आली होती. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाचा १७ लाख विद्यार्थ्यांवर परिणाम होणार असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. विद्यार्थ्यांना दुसऱ्या शाळेत बदली करण्यास सांगणे योग्य नाही. खरं तर, २२ मार्च रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाने यूपी मदरसा कायदा असंवैधानिक घोषित केला होता. हे धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचे उल्लंघन आहे, असे न्यायालयाने म्हटले होते. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर मदरसा बोर्डाच्या याचिकेवर सुनावणी झाली.

### आयोगाने केलेल्या शिफारशी

» राईट टू एज्युकेशन (आरटीई) नियमांचे पालन न करणाऱ्या मदरसा आणि मदरसा बोर्डांना राज्याकडून दिला जाणारा निधी थांबवावा. गैरमुस्लीम मुलांना मदरशातून काढून टाकावे. घटनेच्या कलम २८ नुसार कोणत्याही मुलाला पालकांच्या संमतीशिवाय धार्मिक शिक्षण देता येत नाही. धार्मिक आणि औपचारिक शिक्षण एकाच संस्थेत दिले जाऊ शकत नाही, अशा शिफारशी राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाने केल्या आहेत.

### मुस्लीम अभ्यासकांची टीका

» आयोगाच्या अहवालावर प्रतिक्रिया देताना मुस्लीम अभ्यासक म्हणाले की, या लोकांना संविधानात बनवलेल्या सर्व गोष्टी उलथून टाकायच्या आहेत. हे ते लोक आहेत ज्यांना द्वेषावर राजकारण करायचे आहे, ज्यांना भेदभावावर राजकारण करायचे आहे. हेच ते लोक आहेत, ज्यांना धर्म-जाती भांडणे लावून राजकारण करायचे आहे.

---

# सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करुन निवडणूक यशस्वीपणे पार पाडावी : डॉ. सुहास दिवसे

## भारतीय जनता पक्षाने कसबा विधानसभा मतदारसंघावर लक्ष्य केंद्रीत केले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कामे करुन निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडावी, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयात विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक निर्णय अधिकारी, समन्वय अधिकारी यांच्या कामकाजाबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पुणे मनपा अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी पी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, पिंपरी चिंचवड पोलीस सह आयुक्त शशिकांत महावरकर, जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम आदी उपस्थित होते.

डॉ. दिवसे म्हणाले, भारत निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून आदर्श आचार संहिता लागू झाली आहे. आदर्श आचारसंहितेची सर्व प्रशासकीय यंत्रणांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. आदर्श आचारसंहितेच्या अनुषंगाने प्राप्त तक्रारीवर तत्काळ कारवाई करण्यात यावी. मतदान केंद्रावर आवश्यक शौचालय, पाणी, व्हीलचेअर, रॅम्प, पाळणाघर, औषधोपचार, बसण्याकरीता बाकडे, आदी सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. मतदारसंघातील प्रत्येक मतदान केंद्राला भेटी देऊन उपलब्ध असलेल्या सोई-सुविधांची पडताळणी करावी. शहर हद्दीत महानगर पालिकांनी तर ग्रामीण हद्दीत जिल्हा परिषदेने या व्यवस्था कराव्यात असे आयोगाने निर्देश दिले आहेत.



मतदानाचा टक्का वाढविण्याकरीता मतदार नोंदणी, मतदार जनजागृतीविषयक शिबीरे आयोजित करावीत. बदलेल्या मतदान केंद्राविषयी मतदारांनी माहिती देण्यात यावी. एफएसटी पथके कार्यान्वित करण्यात यावीत. मतदान केंद्रात मोबाईल वापरण्यास प्रतिबंध करण्यात आला असून याबाबत याबाबत यंत्रणेसह मतदारामध्ये जनजागृती करावी. आवश्यकतेप्रमाणे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात यावेत. जिल्ह्यात मतदान प्रक्रिया पारदर्शक, निर्भय वातावरणात आणि सुलभ, सहजतेने पार पाडण्यासाठी प्रयत्न करावे. निवडणूक प्रक्रियेत आपल्या दिलेल्या जबाबदारीप्रमाणे चोखपणे कर्तव्य पार पाडावे, असे डॉ. दिवसे म्हणाले.

ग्रामीण भागात अनधिकृत होर्डिंग्जवर निवडणूक प्रचाराबाबत होत असल्याचे निदर्शनास आल्यास कठोर कारवाई करण्यात यावी. आवश्यक तेथे गुन्हे दाखल करण्यात यावेत, असेही डॉ. दिवसे म्हणाले. डॉ. भोसले म्हणाले, मतदान केंद्रावर उभारण्यात येणाऱ्या शौचालयाची स्वच्छता करावी. रॅम्प सुस्थितीत असल्याची खात्री करुन घ्यावी. मतदारांना आवश्यक त्या सर्व सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. महानगरपालिका क्षेत्रात मतदार जनजागृतीवर भर देण्यात यावे. याकरीता समाजमाध्यमे, वाणिज्यिक आस्थापना, पीएमपीएल बसेस, महानगरपालिकांचे इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले फलक, लघुसंदेश आदी सुविधांचा वापर करावा. तसेच बचतगट गणेश, नवरात्र आणि दहीहंडी मंडळासोबत बैठक त्यांचा सहभाग वाढवावा, शहरी भागातील मतदानाचा टक्का वाढविण्याकरीता महानगरपालिकेच्यावतीने प्रयत्न करण्यात येईल.

शासकीय मालमत्तांचे विद्रुपीकरण कायद्याचे काटेकोर पालन व्हावे. शासकीय मालमत्तांवरील आचारसंहिता भंग होईल अशा राजकीय पक्षांच्या, राजकीय व्यक्तिंच्या जाहिराती तत्काळ काढण्यात याव्यात. २४ तासाच्या आत जाहिराती, मजकूर काढण्यात यावा. खासगी इमारतीवरील, जागेतील मजकूर संबंधिताच्या परवानगीशिवाय लावलेला नसल्यास त्याबाबतही कठोर कारवाई करावी. विद्रुपीकरणबाबत केल्यास गुन्हे दाखल करावेत, असेही डॉ. भोसले म्हणाले.

पोलीस अधीक्षक श्री. देशमुख म्हणाले, संबंधित मतदारसंघाचे नि वडणूक निर्णय अधिकारी व उप विभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे स्ट्राँगची पाहणी करुन आढावा घ्यावा. प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) नुसार हेलिपॅड व विमानाच्या धावपट्टीवरून उड्डाण परवानगीबाबत कार्यवाही व्हावी तसेच तेथील व्हिडिओ चित्रीकरण करण्यात यावे, असेही श्री. देशमुख म्हणाले.

---

# तीन कंत्राटी कनिष्ठ अभियंते निर्दोष; पुन्हा कामावर रुजू

**पिंपरी | प्रतिनिधी**

( पान १ वरून )

पीएमआरडीए क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांना प्रतिबंध करण्यासाठी अतिक्रमण निर्मूलन पथकाची स्थापना करण्यात आली आहे. या पथकात काम करणारे कनिष्ठ अभियंते व तहसीलदार पीएमआरडीए क्षेत्रातील रोज २० इमारतींचे सर्वेक्षण करायचे. हे सर्वेक्षण झाल्यानंतर त्याचा अहवाल कार्यालयामध्ये सादर करणे त्यांच्यावर बंधनकारक होते. मात्र, २० इमारतींचे सर्वेक्षण करून ते १० इमारतींचा सर्वेक्षण अहवाल कार्यालयात सादर करायचे. उर्वरित १० इमारतींना बोगस नोटिसा देऊन भ्रष्टाचार करायचे, असा आरोप सामाजिक कार्यकर्त्याने केला होता. वरिष्ठ अधिकारीही संबंधित अधिकाऱ्यांना पाठीशी घालत होते. या सर्व भ्रष्टाचाराला कंटाळून अनेक नागरिकांनी पीएमआरडीए प्रशासन, मुख्यमंत्री कार्यालयात तक्रारी नोंदवल्या. तसेच एक अधिकारी लाचलुचपत विभागामार्फत लाच घेताना रंगेहाथ देखील पकडला होता.

> “ भ्रष्टाचाराच्या प्रकरणांची निष्पक्षपणे चौकशी होण्यासाठी पीएमआरडीएमधील दक्षता अधिकारी अमोल तांबे यांना चौकशी करण्याचे अधिकार देऊ नये, अशी मागणी पीएमआरडीए आयुक्त योगेश म्हसे यांना पत्र देऊन केली होती. त्याऐवजी पुणे किंवा मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस अधीक्षक अथवा त्यांच्या नियंत्रणाखालील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे हे प्रकरण चौकशीसाठी द्यावे, अशी मागणी केली होती. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे, आलेला अहवाल हा त्यांचा भ्रष्टाचार लपविण्यासारखा प्रकार आहे. संपूर्ण यंत्रणेचा त्याला पाठिंबा असल्याचे चित्र आहे. राज्य शासनाने त्याची गंभीर दखल घेऊन पुढील कारवाई करावी.
>
> **- मारुती भापकर, सामाजिक कार्यकर्ते.**

# चिंचवडमध्ये जगताप कुटुंबाला भाजपमधून विरोध

## जगताप कुटुंबामध्ये उमेदवारी नको, तरच आम्ही पक्षाचे काम करू : माजी नगरसेवकांचा ठराव

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. आज पासून आचारसंहिता देखील लागू झाली आहे. असे असताना भाजपचा बालेकिल्ला असलेल्या चिंचवड विधानसभेत मात्र उमेदवारीवरून मोठा संघर्ष सुरू झाला आहे. जगताप कुटुंबियांच्या घराणेशाहीला विरोध करत चिंचवड मधील भाजपचे अनेक माजी नगरसेवक व पदाधिकारी एकवटले आहेत. आज झालेल्या बैठकीत 'जगताप' सोडून आमच्यापैकी कोणालाही एकाला उमेदवारी द्या..आम्ही काम तर करूच व निवडूनही आणू असा निर्धार देखिल यावेळी करण्यात आला. तसेच पक्षाने दखल न घेतल्यास आम्ही आमची ताकद दाखवून देऊ असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.



बैठकीला माजी नगरसेवक चंद्रकांत नखाते, शत्रुघ्न काटे, संदिप कस्पटे, कैलास बारणे, सिद्धेश्वर बारणे, बाळासाहेब ओव्हाळ, माजी नगरसेविका माधुरी कुलकर्णी, सुनिता तापकीर, सविता नखाते यांसह भाजप युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष राज तापकीर, माजी शहर उपाध्यक्ष राम वाकडकर आदि प्रमुख उपस्थित होते.

या बैठकी संदर्भात माहिती देताना चंद्रकांत नखाते आणि शत्रुघ्न काटे म्हणाले की, चिंचवड विधानसभेत भारतीय जनता पार्टीला माननारा एक मोठा मतदार वर्ग आहे, की जो एखादी व्यक्ति किंवा घराणेशाहीला नाही तर पक्षाला, हिंदुत्ववादी विचारधारेला महत्व देतो. त्यामुळे एकाच कुटुंबात एकाच छताखाली राहणारे सख्ख्या दीर-भावजय यांना महत्वाची पदे देणे हे हिंदुत्ववादी विचारांवर मतदान करणाऱ्या मतदारांना आवडलेले नाही व आता तर ते बोलूही लागले आहेत. जशजशी विधानसभा निवडणूक जवळ येत चालली आहे, तसतसा चिंचवड विधानसभेतील जगताप परीवाराचा विरोध शमण्याऐवजी तो वाढतच चालला आहे. यापूर्वी भाजपाच्या गोटात यांच्या कार्यपद्धतीला व घराणेशाहीला विरोध करीत नगरसेवक तुषार कामठे, नवनाथ जगताप, नगरसेविका माया बारणे, चंदा लोखंडे, सीमा चौधुले यांनी भाजपला रामराम केला आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा असतील किंवा पक्षाचे आजपर्यंतचे सर्वच मोठे नेते यांनी नेहमीच एकाच कुटुंबात एकापेक्षा जास्त महत्वाची पदे देण्यास विरोध केला आहे. त्यामुळे भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाने देखिल घराणेशाहीला महत्व न देता एकाच कुटुंबात सर्व महत्वाची पदे देऊ नये, अशी एकमुखी मागणी या बैठकीत सर्वांनी केली. आणि 'जगताप' सोडून आमच्यापैकी कोणालाही एकाला उमेदवारी द्या.. आम्ही काम तर करूच व उमेदवार निवडूनही आणू असा निर्धार देखिल यावेळी या सर्व नगरसेवक व पदाधिकारी यांनी केला आहे.

पक्षाच्या वरीष्ठांनी आम्हाला संपर्क केला आहे. परंतू आम्ही आमच्या भूमिकेवर ठाम आहोत आणि जर पक्षाने आमच्या मागणीची दखल घेतली नाही, तर आम्ही १४ ते १५ नगरसेवक वेगळी भूमिका घेऊन आमची ताकद दाखवून देऊ, असा इशारा देखील यावेळी सर्व नगरसेवक पदाधिकारी यांनी दिला आहे.

# आचारसंहितेपूर्वी शहरातील 800 कोटींच्या कामांना मंजुरी

## बांधकाम, नगररचना, स्थापत्य, लेखा विभागात गर्दी : मंजूर झालेल्या कामांच्या वर्कऑर्डर, बिल काढण्यासाठी महापालिकेत धावाधाव

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी पिंपरी-चिंचवड महापालिकेत मंगळवारी (दि. १५) अधिकाऱ्यांसह इतरांची चांगली धावपळ उडाली होती. स्थायी समितीच्या बैठकीमध्ये एकाच दिवसात तब्बल ८०० कोटी रुपयांच्या कामाच्या खर्चांना मंजुरी देण्यात आली आहे.

शहरातील विविध विकास कामांच्या निविदा मंजूर करण्यासोबतच मंजूर झालेल्या कामांच्या वर्क ऑर्डर काढण्यासाठी ऑक्टोबरच्या पंधरवड्यात महापालिकेत सकाळपासूनच गर्दी दिसून येत होती. विशेषतः महापालिकेतील बांधकाम, नगररचना, लेखा, स्थापत्यसह अन्य विभागात मंगळवारी आचारसंहिता लागू होण्यापूर्वी लगबग पाहायला मिळाली.

### वर्क ऑर्डरसाठी संध्याकाळी उशिरापर्यंत पळापळ

महापालिका आयुक्तांकडून स्थायीच्या बैठकीत विषय मंजूर करून घेण्यात आले. त्यानंतर मंजूर केलेल्या कामांचे वर्क ऑर्डर देण्यासाठी आयुक्तांची सही घेण्यासाठी विभाग प्रमुखांसह अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची दिवसभर जोरदार धावपळ सुरू होती. महत्त्वाच्या आणि शहराच्या विकासाला आवश्यक असलेल्या विषयांचे प्रस्ताव तयार करून ते मंजुरीसाठी पालिका आयुक्तांच्या चौथ्या मजल्यावरील कार्यालयात घेऊन जात असल्याचे चित्र पाहायला मिळत होते. अधिकाधिक विकास कामे मार्गी लागावी, यासाठी संध्याकाळी उशिरापर्यंत काही विभाग आणि तेथील अधिकारी पालिकेत कार्यरत असल्याचे दिसून आले.

आचारसंहिता जाहीर झाल्यानंतर विविध कामांसाठी निविदा काढण्यास अडचणी येतात. या पार्श्वभूमीवर आपापल्या परिसरातील विविध विषय व कामे आचारसंहितेमध्ये अडकू नयेत, या कामांच्या वर्क ऑर्डर आणि निविदा आचारसंहितेपूर्वी



मंजूर व्हाव्या, यासाठी विद्यमान खासदार-आमदारांसह माजी नगरसेवकांची आणि ठेकेदारांची चांगलीच धावपळ उडाली होती. धावपळ करणाऱ्यांमध्ये सत्ताधारी पक्षाचे पदाधिकारी आणि माजी नगरसेवकांची संख्या अधिक होती.

आचारसंहिता सुरू झाल्यानंतर नव्याने कोणत्याही कामाची निविदा काढता येत नाही तसेच काम सुरू करण्याची परवानगीही दिली जात नाही. यामुळे आचारसंहिता काळात विकास कामे करताना प्रशासनाला मोठ्या प्रमाणात अडचणींना तोंड द्यावे लागते. हे टाळण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करून आचारसंहिता सुरू होण्यापूर्वी काम सुरू करण्याची परवानगी देण्याचे नियोजन महापालिकेच्या स्थापत्य विभागासह अन्य विभागात सुरू होती.

महापालिकेच्या विविध विभागात विकास कामांना मंजुरी दिलेल्या आहेत. त्यात निविदा प्रक्रियाही राबवलेल्या आहेत. मंजूर झालेल्या कामाचा कार्यारंभ आदेश काढण्यासाठी महापालिकेत धावपळ सुरू होती. आचारसंहितेमध्ये आपल्या भागातील विकासकामांच्या निविदा अडकून पडू नये, या निविदा मान्य होऊन काम सुरू करण्याची परवानगी मिळावी, यासाठी ठेकेदारांची गर्दी पालिकेत पाहायला मिळाली. महापालिका प्रशासनाने आचारसंहितेच्या धास्तीने कामाचा वेग वाढवला होता. महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीच्या बैठकांचा सपाटा लागलेला दिसून आला. या बैठकीमध्ये विविध कामांसाठी तब्बल ८०० कोटी रुपयांच्या कामाच्या खर्चांना मंजुरी देण्यात आली. आपले विषय मंजूर करून घेण्यासाठी विभागप्रमुखांसह अधिकारी व कर्मचाऱ्यांची धावपळ सुरू होती. जो तो फाइल घेऊन आयुक्तांच्या चौथ्या मजल्यावरील कार्यालयात जात असल्याचे चित्र पाहायला मिळत होते.

### आचारसंहितेची धास्ती

» विधानसभा निवडणूक आचारसंहिता कधीही लागेल, ही धास्ती राजकीय पक्ष व इच्छुकांना लागली होती. त्यामुळे आचारसंहितेपूर्वी जमेल तेवढ्या कामांना आणि त्यासाठी लागणाऱ्या अवाढव्य खर्चाला मंजुरी देण्याचा सपाटा प्रशासनामार्फत लावण्यात आला. सर्वसाधारणपणे आयुक्त शेखर सिंह दर आठवड्यात मंगळवारी बैठक घेऊन कामे मंजूर करतात. परंतु, मागील दोन आठवड्यात आयुक्तांनी बैठकांचा धडाकाच लावला आहे. यामध्ये सल्लागार संस्था नेमणे, मनुष्यबळ पुरविणे व स्वच्छताविषयक कामांना मुदतवाढ, रस्त्यांचे डांबरीकरण, नवीन रस्ते तयार करणे, जलवाहिनी टाकणे अशा कामांचा समावेश आहे.

# शहरासाठी 1 हजार नव्या ई-बसचा प्रस्ताव

## एकीकडे मेट्रोचे जाळे विस्तारत असताना दुसरीकडे पीएमपीच्या सक्षमीकरणालाही प्राधान्य

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात मेट्रो मार्गिकांचे जाळे विस्तारत असतानाच पीएमपीचे सक्षमीकरण करण्यासंदर्भात वीजेवर धावणाऱ्या (ई-बस) एक हजार नव्या बस खरेदीचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी तसा प्रस्ताव केंद्रीय अवजड उद्योग मंत्री एच. डी. कुमारस्वामी यांना दिला आहे. त्यानुसार या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश कुमारस्वामी यांनी त्यांच्या विभागातील अधिकाऱ्यांना दिले आहेत.



शहरात मेट्रो प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यांतर्गत वनाज ते रामवाडी आणि पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट या दोन मार्गावरील प्रवासी सेवा पूर्ण क्षमतेने सुरू झाली आहे. या दोन्ही मार्गिकांची एकूण लांबी ३२ किलोमीटर एवढी आहे. त्यातच खडकवासला ते खराडी आणि नळस्टॉप ते माणिकबाग या दोन नव्या उन्नत मार्गिकांनाही राज्याच्या मंत्रिमंडळाने परवानगी दिली आहे. तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून 'बांधा-वापरा-हस्तांतरित करा' या तत्वावर शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो मार्गिकेचे काम सध्या सुरू आहे. शहरात एकीकडे मेट्रोचे जाळे विस्तारत असताना दुसरीकडे पीएमपीच्या सक्षमीकरणालाही प्राधान्य देण्यात आले आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील प्रवाशांची संख्या लक्षात घेता पीएमपीच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या अपुरी आहे. या दोन्ही शहरातील लोकसंख्या आणि प्रवासी लक्षात घेता ताफ्यात किमान तीन हजार गाड्यांची आवश्यकता आहे. गेल्या काही महिन्यात केंद्र सरकारच्या माध्यमातून शहराला वीजेवर धावणाऱ्या (ई-बस) ४०० गाड्या प्राप्त झाल्या आहेत. मात्र प्रवाशांचा प्रवास सुखकर, जलद आणि सुरक्षित व्हावा, यासाठी नव्याने एक हजार गाड्यांचा प्रस्ताव केंद्र सरकारला देण्यात आला आहे.

> “पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेत आल्यापासून शहराचा सर्वांगिणक आणि सुनियोजित विकास सुरू झाला आहे. पीएमपीच्या ताफ्यातील संख्या, आवश्यकता आणि भविष्यातील गरज लक्षात घेता एक हजार गाड्या घेण्याचा प्रस्ताव केंद्रीय मंत्र्यांना देण्यात आला आहे. त्यासंदर्भात तातडीने सकारात्मक कार्यवाही करण्याचे आदेश केंद्रीय अवजड मंत्री एच. डी. कुमारस्वामी यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत.
>
> **- मुरलीधर मोहोळ, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री.**

# पीएमआरडीएची नवीन विकासकामे पडणार ठप्प

## नव्याने निविदा कार्यवाही, कामांचे आदेश देता येणार नसल्याने कामे रखडणार

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता मंगळवारी(दि. 15) लागल्याने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला(पीएमआरडीए) मंजुरी न मिळालेली नवीन विकासकामे करता येणार नाहीत. तसेच, नव्याने निविदा कार्यवाही, कामांचे आदेश देता येणार नसल्याने कामे रखडणार आहेत.

पीएमआरडीएचा प्रारुप विकास आराखडा अद्याप अंतिम झालेला नाही. ही बाब न्यायप्रविष्ट आहे. त्यातच आचारसंहिता सुरु झाली असल्याने याबाबतचा निर्णय लांबणीवर पडू शकतो. सोळू ते वडगाव शिंदे या पाच किलोमीटर अंतरातील रिंगरोडच्या पहिल्या टप्प्यातील कामासाठी सध्या भूसंपादन प्रक्रियाच सुरु आहे.



आचारसंहिता 23 नोव्हेंबरपर्यंत लागू राहणार असल्याने या कालावधीत प्रत्यक्ष रस्त्याच्या कामासाठी निविदा प्रक्रिया, कायदिश आदी कार्यवाही करता येणार नाही. पर्यायाने, रस्ता उभारणीला सुरुवात करणे अवघड आहे.

### निविदा कार्यवाही न झालेली कामे रखडणार

पीएमआरडीएच्या सप्टेंबर महिन्यात झालेल्या सभेत 3 हजार 838 कोटी 61 लाख रुपयांचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला. त्याशिवाय, या बैठकीत विविध कामांना मंजुरी देण्यात आली. पुणे आपत्ती प्रतिसाद पथकाच्या स्थापनेला मंजुरी दिली.

10 ठिकाणी अग्निशमन आणि आपत्ती व्यवस्थापन केंद्र, प्रमुख महामार्ग जोडण्यासाठी मिसिंग लिंक रस्त्यांचे बांधकाम, 11 मलनिःसारण योजना, नदी प्रदुषण नियंत्रण प्रकल्प राबविणे आदी कामांना मंजुरी मिळालेली आहे. त्याशिवाय, पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रातील हॉलचे काम पीपीपी तत्त्वावर राबविण्यासाठी व्यवहार सल्लागाराची नेमणुकीस मंजुरी मिळाली.

इनर रिंगरोडलगत 5 मल्टीमोडल हब उभारणे, 20 नगररचना योजनांचे नियोजन आदी कामे मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत मंजुर करण्यात आली. या कामांच्या प्राथमिक प्रक्रियेला देखील सुरुवात झालेली आहे. तथापि, या कामांमध्ये जिथे अद्याप निविदा कार्यवाही झालेली नाही. कायदिश दिलेले नाहीत, ती कामे मात्र रखडणार आहेत.

### मेट्रोच्या कामाला अडथळा नाही

माण-हिंजवडी ते शिवाजीनगर दरम्यान होत असलेल्या मेट्रोच्या कामाला मात्र तूर्तास कोणताही अडथळा नाही. आचारसंहितेपुर्वीच हे काम सुरु झालेले आहे. पीएमआरडीएच्या पेठ क्रमांक 12 आणि वाल्हेकरवाडी येथील गृहप्रकल्पातील शिल्लक एकूण 1 हजार 337 सदनिकांसाठी निवडणूक आचारसंहितेपुर्वी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

त्यामुळे या कामाला देखील अडथळा नाही. त्याशिवाय, गुंठेवारी कायद्यानुसार पीएमआरडीए हद्दीतील घरे नियमित करण्यासाठी 31 मार्च 2025 पर्यंत मुदत दिलेली आहे. हे काम देखील मार्गी लागू शकणार आहे. लोणावळा येथील टायगर व लायन्स पॉईंट येथे ग्लास स्काय वॉक प्रकल्पाचे काम केले जात आहे.

त्यासाठी नियोजन विभागामार्फत 333 कोटी इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता आहे. विविध रस्ते व प्रकल्पांसाठी 40 निविदा आचारसंहितेपुर्वी काढण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी ज्या कामांना कायदिश मिळालेले नाहीत, ती कामे लांबणीवर पडणार आहेत.

### विकास आराखडा रखडणार

**» पीएमआरडीएच्या प्रारुप विकास आराखड्याबाबत मुंबई उच्च न्यायालयात 21 ऑक्टोंबरला सुनावणी होणार आहे. या सुनावणीमध्ये न्यायालयाकडून निर्णय झाल्यास कायदेशीर बाबी तपासुनच पुढील कार्यवाही करावी लागणार आहे. प्रशासकीय स्तरावर त्याची अंमलबजावणी करण्यापूर्वी लोकप्रतिनिधींची भूमिका जाणुन घ्यावी लागणार आहे. मात्र, निवडणुक आचारसंहितेमुळे ही बाब शक्य नाही. पर्यायाने, आराखडा रखडण्याचीच शक्यता जास्त आहे.**